Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 155 Displayed on : 08/10/2018 11 OCT 2018

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०१८–१९ ( ई.बी.सी.)

## ( फक्त सिनीयर विभागातील विद्यार्थ्यांसाठी)

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शै. वर्ष २०१८–१९ करीता महाडीबीटी पोर्टल ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट चालू झालेली आहे. वेबसाईट खालीलप्रमाणे आहे.

**Website - mahadbt mahait.gov.in**

अटी व शर्ती –

१. शिष्यवृत्तींसाठी ऑनलाईन फॉर्म भरताना शिष्यवृत्ती साठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तींचे पालन करुनच ऑनलाईन फॉर्म भरावा.
२. शिष्यवृत्तीच्या फॉर्मसोबत जोडावयास सांगण्यात आलेले सर्व आवश्यक कागदपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तींची रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येणार असलेने विद्यार्थ्यांनी फॉर्ममध्ये बॅंकखाते बाबत माहिती तसेच आधार क्रमांकाची माहिती अचूक भरावी.
४. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांना मिळेल.
५. या योजनेचा लाभ दूरस्थ पध्दतीने (Open/Distance/Virtual Learning) अथवा अर्धवेळ (Part-Time) स्वरुपात चालविल्या जाणा–या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.
६. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.
७. या योजनेकरिता पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/– पर्यंत असावे.

**ऑनलाईन फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे –**

१. मागील वर्षाच्या मार्कशिटची झेरॉक्स प्रत.
२. सन २०१७–१८ चा मा. तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखल्याची झेरॉक्स प्रत.
३. डोमासाईलची (अधिवास प्रमाणपत्र) झेरॉक्स प्रत.
४. आधारकार्डची झेरॉक्स प्रत.

Scanned by CamScanner

५. बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत.
६. आधार लिंकींग पावती झेरॉक्स प्रत.
७. शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क चलनाची झेरॉक्स.
८. रेशनकार्ड झेरॉक्स.
९. शै.गॅप असेल गॅप ॲफिडेव्हीट.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप व फ्रिशिपचे फार्म भरताना महाडीबीटी पोर्टलवर खालील योजनेतून फॉर्म भरावा.

**१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना — Directorate of Higher Education**

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सदर शिष्यवृत्तीचा फार्म भरल्यानंतर ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक असणारी कागदपत्रे जोडून प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागाच्या खिडकीवर जमा करावा. खुल्या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्याच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेची नि:शुल्क सुविधा आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सायबर कॅफे मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त वापर करावा.**

| | |
|---|---|
| रजिस्ट्रार | प्राचार्य |
| तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, |
| बारामती | बारामती. |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Scanned by CamScanner